प्रकरण पहिले

# उपोद्‌घात

प्रकरण पहिले

# उपोद्‌घात

## १.१ प्रास्ताविक :

महाराष्ट्र ही साधुसंताची भूमी आहे. तसेच ती सुधारकांचीही भूमी आहे. महाराष्ट्रात अनेक सुधारक होऊन गेले. ज्यांनी आपले आयुष्य समाजसुधारणेसाठी वेचले, त्यातीलच एक अग्रणी व्यक्ती म्हणजे म. फुले हे होय. आजपर्यंत म. जोतिराव फुले ह्यांच्यावर अनेक माध्यमातून लिहिले गेले आहे. कादंबरी, कविता, नाटक त्यातीलच एक कादंबरी 'महात्मा' ही होय. ह्या कादंबरीचा म. फुले ह्यांच्या जीवनावरील कादंबरीत चौदावा क्रमांक लागतो. १९९९ मध्ये प्रकाशित झालेल्या रवींद्र ठाकूर ह्यांच्या 'महात्मा' ह्या कादंबरीच्या वाचनाने म. जोतिराव फुले ह्या महामानवाची खरी ओळख पटली. त्यांचे कार्य, त्यांच्या कार्याची तळमळ हे सर्व जाणवले.

## १.२ अभ्यास विषय निवडण्यामागील भूमिका :

चरित्र व चरित्रात्मक कादंबरी यांचे वाचन करण्याची मला पूर्वीपासून आवड आहे. त्यातून नव्या पिढीतील एक कवी. कादंबरीकार, समीक्षक, संशोधक, शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील एक प्राध्यापक डॉ. रवींद्र ठाकूर ह्यांची 'महात्मा' (१९९९) ही म. फुल्यांवरील चरित्रात्मक कादंबरी माझ्या वाचनात आली. या कादंबरीने मी विलक्षण प्रभावित झाले. महात्मा फुल्यांवर मराठीत तेराच्या आसपास चरित्रात्मक कादंबऱ्या आहेत. 'महात्मा' (१९९९) पूर्वी प्रकाशित झालेल्या कादंबऱ्यापेक्षा 'महात्मा' ही कादंबरी मला आगळी वेगळी महत्वपूर्ण व दर्जेदार वाटली. महाराष्ट्राच्या किंबहुना भारताच्या समाज परिवर्तनाच्या चळवळी मध्ये महात्मा फुल्यांना महत्वाचे स्थान आहे. डॉ. आंबेडकर कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांच्यासारख्या महामानवांनी त्यांना गुरुस्वामी मानलेले

आहे. महात्मा फुले हे ब्राह्मणविरोधी नव्हते, तर ब्राह्मणांविरोधी होते. या दृष्टिकोनातून अलीकडे त्यांच्या विचारांचे व जीवनकार्याचे पुनर्मूल्यमापन केले जाऊ लागले आहे. या पार्श्वभूमीवर १९९९ मध्ये प्रकाशित झालेल्या रवींद्र ठाकुरांच्या 'महात्मा' या कादंबरीला निश्चितच महत्व प्राप्त होते. ह्या कादंबरीवर आधारीत एक मराठी दूरदर्शन मालिकाही सध्या तयार करण्यात येत आहे. शिवाय या कादंबरीला मेहता पब्लिशिंग हाऊस ह्या नामवंत प्रकाशन संस्थेने पुरस्कार देऊन गौरविलेले आहे. ह्या सर्व कारणांमुळे रवींद्र ठाकुरांच्या 'महात्मा' ह्या कादंबरीवर चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक होऊन जाते.

महाराष्ट्रामध्ये अनेक समाज सुधारक होऊन गेले. कृती आणि उक्ती यांची जोड इतर समाज सुधारकांपेक्षा म. फुले यांच्यात अधिक प्रमाणामध्ये दिसून येते. महात्मा फुल्यांनी 'आधी केले, मग सांगितले', ह्याप्रमाणे प्रथम दिघे यांच्यात वाड्यात मुलींसाठी १ जानेवारी १८४८ रोजी मुलींची शाळा स्थापन केली. महारा-मांगासाठी स्वतःच्या पाण्याचा हौद खुला केला. बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना केली. विधवा विवाहास चालता दिली. अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले.

महाराष्ट्रातील अनेक समाज सुधारकांच्या जीवन कार्याचा अनेक साहित्यिकांनी लेखन केले. पण महात्मा जोतिराव फुले ह्यांच्या कार्याची ओळख महाराष्ट्राला असूनही साहित्यिकांनी त्यांच्या कार्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. पंढरीनाथ सिताराम पाटील, डॉ. य. दि. फडके, धनंजय कीर, स. ग. माळशे, हरी नरके आदींनी स्वतंत्र स्वरूपात किंवा संपादनाच्या स्वरूपात म. फुल्यांच्या जीवनाची विचारांची व कार्याची ओळख महाराष्ट्राला करून दिलेली आहे. फुले यांचे चरित्र कहाणी सांगण्यासाठी कथात्म ललित माध्यमाचा वापर अनेक लेखकांनी केला आहे. आजपर्यंत फुले यांच्या जीवन चरित्रावर कथात्मक ललित पुष्कळ प्रमाणात झाले. त्यातील अनिरुध्द पुनर्वसू यांची 'प्रभंजन' ही चरित्रात्मक कादंबरी फुले यांच्या जीवनकार्याचा आवाका पूर्णत: पकडू शकली नाही. पूर्ण जीवनपट या

कादंबरीमध्ये व्यक्त होऊ शकला नाही. 'महात्मा' मध्ये मात्र जोतिरावांच्या उत्तर काळात त्यांच्या सहकाऱ्यांची त्याचे जे वैचारिक मतभेद झाले, त्याचे चित्रण आले आहे. आजारी असताना सुध्दा जोतिरावांनी त्यांचे कार्य सुरुच ठेवले होते. क्रांतीची चळवळ पुढेच नेली. या घटनांचे चित्रण 'महात्मा' मध्ये ठाकूर यांनी केले आहे. म्हणून या विषयाचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा विषय मी एम्. फिल्. साठी निवडला आहे.

मराठी कादंबरीचा इतिहास सुमारे दीडशतकाचा आहे. मराठी कादंबरीचा जन्म एकोणिसाव्या शतकात झाला. 'कादंबरी' हा विस्तृत भाषिक अवकाश असलेला वाङ्मय प्रकार असल्याने तिच्यातील घटकांचा आवाकाही मोठा असतो. कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना, मांडणारी, अनेक पात्रे-प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली अशी साहित्यकृती असते. 'कादंबरी' हा शब्द मराठीने बाणभट्टाच्या संस्कृत मद्यरचनेवरुन रुढ झाला. सुरुवातीला का. बा. मराठे ह्यांनी इंग्रजी नॉव्हेल या शब्दावरुन मराठीत 'नावल' हा शब्द करण्याचा प्रयत्न केला. मराठी कादंबरीचे स्वरूप व्यमिश्र आहे. मराठी कादंबरीच्या इतिहासाचे सिंहावलोकन करता पुढील तीन प्रवृत्ती दिसून येतात, यमुना पर्यटन प्रवृत्ती, मुक्तामाला प्रवृत्ती ह्या तीन प्रवृत्तीच्या अनुषंगाने कादंबरीच्या प्रेरणा परंपराचा मागोवा घेता येतो.

मराठी सारस्वताचे समृध्द दालन कादंबरीने अधिकच समृध्द बनविले आहे. विविध वैशिष्ट्यांनी नटलेल्या कादंबरी प्रवाहात कादंबरीचे अनेक प्रकार पाहावयास मिळतात. त्यातीलच एक म्हणजे चरित्रात्मक कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी ही ऐतिहासिक - पौराणिक कादंबरीतून निर्माण झालेली आहे. चरित्रात्मक कादंबरीचा उगम ऐतिहासिक कादंबरीपासून झाला असला तरी ऐतिहासिक साहित्यापुरता तो मर्यादित राहिला नाही. चरित्रात्मक कादंबरीतून चरित्र नायकाच्या जीवनातील काही प्रमुख घटना व त्यांना अनुसरुन कांही

कल्पित घटना यांच्या साहचर्याने कलात्मक चरित्र कथा लिहिली. तर ती कलाकृती कादंबरी म्हणून अधिक प्रभावी ठरते. असे श्री. ज. जोशी 'आनंदी गोपाळ' वरुन दिसून येते.

चरित्रात्मक कादंबरीत आशयाची आभासमय प्रत्ययावर संपूर्ण भिस्त असते. हा प्रकार कादंबरी आणि चरित्र ह्यांच्या सीमारेषेवरचा, दोन्ही कडचे निवडक घटक जुळवलेला, संकरित असा आहे. चरित्रात्मक कादंबरीत कादंबरीकाराला चरित्रातल्या वस्तुनिष्ठतेची शिस्त आणि प्रत्यक्षाशी किंवा ऐतिहासिक प्रत्यक्षांशी संपूर्णत: प्रामाणिक राहण्याची कसोटी या दोन्ही गोष्टी नको असतात. उलट जन्मापासून मृत्यूपर्यंत तयार पात्राची प्रतिकृती त्याला करावी लागते. पात्राच्या पलीकडे संरचना करता येत नाही. 'आनंदी गोपाळ' (श्री. ज. जोशी), दुर्दम्य (गंगाधर गाडगीळ) ह्या मराठीतील महत्वाच्या चरित्रात्मक होत ह्या कादंबऱ्यामधून त्या त्या काळातील थोर व्यक्तींचा जीवनकार्याचा पट मांडलेला आहे.

ठाकुरांची 'महात्मा' ही अलीकडील महत्वाची चरित्रात्मक कादंबरी होय. प्रस्तुत कादंबरी ही वाङ्मयीन व सामाजिक दृष्टीने कशी उत्कृष्ट आहे, या अनुषंगाने मी अभ्यास करणार आहे. थोडक्यात 'महात्मा' या कादंबरी संबंधी असे म्हणता येईल की, मराठीत आजपर्यंत चरित्रात्मक कादंबऱ्या पुष्कळ आहेत. 'महात्मा' ही महात्मा जोतिराव फुले ह्यांच्या जीवनावरील मराठीतील अत्यंत महत्वाची चरित्रात्मक कादंबरी आहे. कादंबरीकाराने या कादंबरीत महात्मा फुले ह्यांच्या जीवनाचा वृत्तांत काटेकोरपणे दिलेला आहे.

## १.३ वापरलेल्या संशोधनपद्धती व स्वीकारलेले धोरण :

'महात्मा' एक चिकित्सक अभ्यास हा विषय अभ्यासताना मी प्रामुख्याने चरित्रात्मक, ऐतिहासिक व समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब करणार आहे. महात्मा ही चरित्रात्मक कादंबरी आहे. तिच्याद्वारे म. फुले यांचे चरित्र कादंबरीकाराने उलगडलेले आहे. म्हणून चरित्रात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक ठरते.

म. फुले यांचे चरित्र हा आज इतिहासाचा विषय झालेला आहे. त्यांच्या चरित्रामधून स्वातंत्र्यपूर्व काळातील समाज परिवर्तनाचा इतिहास जाणून घेता येतो. म्हणून ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा अवलंब करणे योग्य ठरणार आहे. 'महात्मा' या कादंबरीमध्ये केवळ फुल्यांचाच चरित्रपट उलगडत गेलेला नाही, तर म. फुले यांच्याबरोबरच तात्कालीन समाजाचाही चरित्रपट गेलेला आहे. म. फुले हे केवळ स्वत:साठी जगलेले नव्हते, तर समाजासाठी जगलेले आणि झिजलेले थोर महामानवच होते. म्हणून समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा अवलंब करणे उपयुक्त होणार आहे.

मराठी कादंबरीच्या आजपर्यंतच्या वाटचालीमध्ये अनेक चरित्रात्मक कादंबऱ्या आढळतात त्यांचा संदर्भ लक्षात घेवून 'महात्मा' ही चरित्रात्मक कादंबरी अभ्यासण्याचे धोरण मी निश्चितच केले आहे. त्याच बरोबर 'महात्मा' या फुले ह्यांच्या जीवनावरील कादंबरी पूर्वी फुले यांच्या जीवनावर तेराच्या आसपास मराठी कादंबऱ्या आढळतात. त्यांचाही संदर्भ योग्य त्या ठिकाणी, योग्य त्या प्रमाणात पाहत त्या सर्वांपेक्षा 'महात्मा' ही कादंबरी कशी आगळी वेगळी, महत्वपूर्ण व दर्जेदार आहे. ते शोधण्याचे धोरण मी निश्चित केलेले आहे.

## १.४ प्रबंधिकेची क्रमश: मांडणी :

१. उपोद्घात

२. मराठी चरित्रात्मक कादंबरी : स्वरूपचिकित्सा व विकास

३. 'महात्मा' मधील कथानक

४. 'महात्मा' मधील व्यक्तिरेखा

५. 'महात्मा' मधील वातावरणनिर्मिती

६. 'महात्मा' मधील भाषाशैली

७. 'महात्मा' चे महत्त्व

८. उपसंहार

९. परिशिष्टे

१०. संदर्भसूची

## १.५ समारोप :

अशा प्रकारे प्रस्तुत प्रबंधिकेत आठ प्रकरणांमधून रवींद्र ठाकूरलिखित 'महात्मा' ह्या चरित्रात्मक कादंबरीचा चिकित्सक अभ्यास अभिप्रेत आहे. शेवटी परिशिष्टे जोडली असून त्यानंतर संदर्भसूचीचा अंतर्भाव केलेला आहे.